# Indian Academy of Pediatrics (IAP)

## महाराष्ट्र राज्य बालरोग तज्ज्ञ संघटना (MAHAIAP)

# पालकांसाठी मार्गदर्शक तत्त्वे

## प्रकरण : ८० वे

# माझ्या मुलाला ताप आणि खोकला आहे, काय करु?

अध्यक्ष २०२३ : **डॉ. रमाकांत पाटील**
सचिव २०२२-२३ : **डॉ. अमोल पवार**
अध्यक्ष २०२२ : **डॉ. हेमंत गंगोलिया**
मार्गदर्शक : **डॉ. जयंत उपाध्ये**
समन्वयक : **डॉ. नरेंद्र नानिवडेकर**
अनुवादक : **डॉ. उज्वला गवळी**
पुनरावलोकन : **डॉ. चित्रा दाभोळकर**
**श्री. अविनाश शिरगावकर**

*Convener:* Mahesh Mohite
*Members:* Geeta D Khanna, Prashant B Jadhav, S Venkateswaran
*Reviewer:* Jayant Kumar Upadhyay



ताप आणि खोकला ही लहान मुलांच्या आजारातून सर्वात जास्त दिसून येणारी लक्षणे होत. मात्र त्याची कारणे वेगवेगळी असल्यामुळे योग्य ते निदान करुन औषधोपचार करावे लागतात. त्याबाबत पालकांनी काय काळजी घ्यावी याची चर्चा आज आपण पाहू या.

**माझ्या मुलाला ताप आणि खोकला आहे, मी काय करु? याबद्दल वारंवार विचारले जाणारे १० प्रश्न**

१. माझ्या मुलाला ताप आणि खोकला का येतो?
२. लक्षणीय ताप किंवा खोकला म्हणजे काय?
३. माझ्या मुलाला ताप आणि खोकला येण्याचे संभाव्य कारण काय आहे? तो कधी कमी होईल?
४. माझे मुल ताप आणि खोकल्याने आजारी असल्यास त्याला घेऊन डॉक्टरांकडे कधी जाऊ?
५. ताप आणि खोकल्याने आजारी असलेल्या माझ्या मुलाची काळजी कशी घेऊ?
६. माझ्या मुलाला वारंवार ताप आणि खोकला येत आहे. मी ते कसे रोखू? त्याची प्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी काय करु?
७. माझ्या मुलाची रक्त तपासणी करणे किंवा छातीचा एक्स-रे काढणे आवश्यक आहे का?
८. आपण मुलाला प्रतिजैविके (अँटीबायोटिक) देऊ या का? गेल्यावेळी त्यामुळे पटकन गुण आला होता.
९. माझ्या मुलासाठी औषधांच्या दुकानात मिळणारी खोकल्याची औषधे किंवा खोकला आणि ताप यावरील एकत्रित औषध वापरु शकतो का? लहान मुलांना, मोठ्या माणसांच्या औषधाचा अर्धा डोस देऊ शकतो का?
१०. माझ्या ३ महिन्यांच्या बाळाला ताप आणि खोकळा आहे. हा माझ्या पाच वर्षाच्या मुलाला आलेल्या ताप आणि खोकल्यासारखाच आजार आहे का?

**Under the Auspices of the IAP Action Plan 2021–2022**

**Piyush Gupta** — IAP President 2021
**Remesh Kumar R** — IAP President-Elect 2021
**Bakul Parekh** — IAP President 2020
**GV Basavaraja** — IAP HSG 2020–2021
**Deepak Ugra** — National Co-ordinator

© Indian Academy of Pediatrics

## IAP Parent Guideline Committee

**Chairpersons:** Piyush Gupta, Bakul Parekh
**IAP Co-ordinators:** GV Basavaraja, Harish Kumar Pemde, Purna Kurkure

### Core Group

*National Co-ordinator:* ***Deepak Ugra***
*Member Secretaries:* ***Upendra Kinjawadekar, Samir Dalwai***
*Members:* ***Apurba Ghosh, CP Bansal, Santosh Soans, Somashekhar Nimbalkar, S Sitaraman***

# माझ्या मुलाला ताप आणि खोकला आहे, काय करु?

**ताप आणि खोकला ही लहान मुलांमधील आजारांमध्ये आढळून येणारी लक्षणे म्हणजे आजार नव्हे. ताप किंवा खोकला स्वतंत्रपणे किंवा एकत्रित दिसतात, त्यांचा क्रम बदलतो तेव्हा त्यांचे योग्य निदान व उपचार करण्याची गरज असते.**

प्र. १

## माझ्या मुलाला ताप आणि खोकला का येतो?

सर्वसामान्य निरोगी माणसाला त्याच्या प्रतिकारशक्तीमुळे शरीरावर झालेल्या कोणत्याही आघातापासून संरक्षण मिळू शकते. उदा. जर एखादा कण तुमच्या श्वसन नलिकेमध्ये किंवा फुफुसांमध्ये शिरला तर शरीर खोकून तो कण बाहेर काढण्याचा प्रयत्न करते. जेव्हा श्वसनमार्गात किंवा लहान श्वसननलिकेत किंवा कोशिकांमध्ये दाह असेल, तो जंतूसंसर्गामुळे किंवा ॲलर्जीमुळे असू शकतो. पण त्यामुळे खोकला येतो. अशाप्रकारे खोकला मानवी शरीराची एक संरक्षण यंत्रणा आहे. खोकल्याची विविध कारणे आहेत. उदा. विषाणू संसर्ग, ॲलर्जी, दमा किंवा श्वसननलिकेमध्ये आलेला काही अडथळा किंवा एखादा पदार्थ श्वासनलिकेमध्ये अडकला तर मुलांमध्ये खोकल्याचे सर्वसामान्य कारण विषाणू संसर्ग हे आहे. कुठल्याही आजारावर विशिष्ट प्रभावी उपचार देण्यासाठी योग्य कारणे ओळखणे फार महत्वाचे आहे.

ताप सुद्धा शरीराच्या संरक्षण यंत्रणेचा भाग आहे. जेव्हा कोणताही संसर्गजन्य विषाणू किंवा जिवाणू शरीरात प्रवेश करतो तेव्हा शरीर त्याला बाहेर काढण्यासाठी संरक्षणयंत्रणा सक्रीय करते. या प्रक्रियेत शरीरात भरपूर रसायने सोडली जातात. त्यामुळे शरीर गरम होते हे वाढलेले तापमान संसर्ग निर्माण करणाऱ्या जंतूंचा नाश करण्यासाठी महत्वाचे असते. अशा प्रकारे ताप ही सुद्धा संसर्गापासून रक्षण करणारी शरीराची संरक्षण यंत्रणा आहे. संसर्ग नसलेल्या आजारांमध्ये सुद्धा ताप येऊ शकतो. उदा. दीर्घकाळ चालणारे विकार किंवा रक्ताच्या कर्करोगासारखे काही गंभीर आजार तापाचे नेमके कारण वेळेवर ओळखणे आवश्यक आहे. अचूक निदान आणि योग्य उपचार केले पाहिजेत. सर्वसाधारणपणे मुलांमध्ये ताप हे संसर्गाचे लक्षण आहे.

प्र. २

## लक्षणीय ताप किंवा खोकला म्हणजे काय?

- तापाचे योग्य निदान आणि व्यवस्थापन करण्यासाठी तापाची नोंद ठेवणे आवश्यक आहे.
- शरीराचे तापमान जेव्हा प्रमाणापेक्षा जास्त वाढते त्याला ताप म्हणतात. त्याची व्याख्या अशी केली जाते.

  गुदद्वारात घेतलेले तापमान १००.४°फॅ/ ३८° से.

  कपाळावर घेतलेले तापमान १००.४°फॅ/ ३८°सें

  कानात घेतलेले तापमान १००.४°फॅ/ ३८° सें

  तोंडातील घेतलेले तापमान १००°फॅ/ ३७.८°सें

  काखेत घेतलेले तापमान ९९°फॅ/ ३७.२°सें
- लहान मुलांमध्ये ताप हे नेहमी धोक्याची किंवा जीवघेणे लक्षण असत नाही. जरी ताप खुप तीव्र असेल तरी तो आजाराच्या तीव्रतेच्या सम प्रमाणात असेल असे नाही. कधी कधी खेळणाऱ्या बाळापेक्षा जास्त काळजी घ्यायला लागते.
- अचूकतेच्या आणि सुरक्षिततेच्या दृष्टीने डिजिटल थर्मामीटरने तापाची नोंद ठेवणे योग्य आहे. तापासाठी कोणतेही औषध देण्यापूर्वी ताप मोजणे आवश्यक आहे. तसेच तारीख, वेळ व तापमान अशी नोंद ठेवावी. तापाचे स्वरुप ओळखण्यासाठी औषधांचा प्रतिसाद आजमावण्यासाठी तसेच अचूक निदानासाठी या सर्वांची मदत होते.
- कधी लहान बाळास जास्त किंवा उबदार कपड्यात गुंडाळून ठेवले जाते आणि ताप येतो. अशा परिस्थितीत बाळाला काही मिनिटे उघडे ठेवल्यास तापमान पुन्हा नॉर्मल होऊ शकते.
- लहान मुलांमधील खोकल्यासंबंधी अनेक वेळा गैरसमज निर्माण होतो. कित्येक वेळा आई-वडील, छातीतील घरघर आवाज ऐकून तान्हा बाळाला घेऊन येतात. बाळाच्या घशातील स्त्रावांमुळे हे आवाज येतात आणि लहान मुलांमध्ये हे नॉर्मल असते. जर बाळ वारंवार खोकला असेल, श्वसोश्वास जलद होत असेल किंवा हालचाल कमी होत असेल, बाळ निपचित पडले असेल किंवा त्याला आहार घेण्यास त्रास होत असेल तर मुलाला डॉक्टरांकडे तपासणीसाठी नेणे आवश्यक आहे.

## प्र. ३

### माझ्या मुलाला ताप आणि खोकला येण्याचे संभाव्य कारण काय आहे? तो कधी कमी होईल?

मुलांमध्ये ताप आणि खोकल्याचे प्रमाण सर्वात सामान्य कारण म्हणजे विषाणूंचे संक्रमण. अशा स्थितीत तापासोबत खोकला येतो आणि त्याबरोबर सर्दी, नाक चोंदणे, अंगदुखी आणि डोकेदुखी ही लक्षणे आढळतात. विषाणूजन्य ससंर्गामध्ये ताप साधारण ३ ते ५ दिवस असतो आणि खोकला १ ते ३ आठवडे राहू शकतो.

- काही वेळेस ताप आणि खोकला ही जीवाणूजन्य आजाराची -न्यूमोनिया किंवा अधिक भयंकर रोगाची लक्षणे असू शकतात. ४ दिवसाहून अधिक दिवस ताप चालू राहिल्यास किंवा ताप-खोकल्या व्यतिरिक्त आढळून येणाऱ्या इतर लक्षणांबरोबर खोकला उत्तरोत्तर वाढत असल्यास गंभीर आजाराची शक्यता असते. आणि त्वरित डॉक्टरांना भेटणे आवश्यक ठरते. जीवाणूंच्या संसर्गामध्ये ताप आणि खोकला योग्य उपचार केल्याशिवाय कमी होत नाही.
- तापापेक्षा खोकला जास्त असल्यास ॲलर्जीसारखे कारण असू शकते. कधी कधी बालपणातील दम्यामध्ये खोकला हे प्रमुख लक्षण असते आणि ताप हा क्षणिक कमी प्रमाणात असतो.

## प्र. ४

### माझे मुल ताप आणि खोकल्याने आजारी असल्यास त्याला घेऊन डॉक्टरांकडे कधी जाऊ?

**तुम्ही घरी ताप आणि खोकला कधी हाताळू शकता?**

❖ ताप आणि खोकल्याच्या पहिल्या ३ ते ४ दिवसात जर मुल पॅरासिटॅमल या औषधाला प्रतिसाद देत असेल, चांगले खेळत असेल, तापाच्या कालावधीनंतर व्यवस्थित आहार घेत असेल, लघवी योग्य प्रमाणात करत असेल तर काहीही करण्याची गरज नाही. ताप मोजून रेकॉर्ड ठेवा आणि घरी निरीक्षण करा.

❖ डॉक्टरांचा सल्ला लगेच घ्या जर :

- ताप पॅरासिटॅमॉलला प्रतिसाद देत नसेल,
- ताप नसतांना जर मुल निपचित पडून राहत असेल, खेळत नसेल,
- खोकला आणि तापाने त्याच्या झोप, आहार, खेळणे यामध्ये जर व्यत्यय येत असेल,
- ताप ३ दिवसापेक्षा जास्त असेल,
- श्वसन जलद होत असेल किंवा श्वास घेण्यास त्रास होत असेल किंवा बोलतांना श्वासोच्छवासाच्यावेळी वेगळा आवाज येत असेल, घरघर वाटत असेल,
- गुदमरल्या सारखं वाटत असेल,
- चेहरा निळसर किंवा फिकट पडला असेल,
- मुल खूप झोपत असेल,
- जेवण कमी घेत असेल, लघवी कमी करत असेल

मुलाला आधीपासून मोठा आहार असेल तर कधीही ताप आला ताप आला तर ताबडतोब आपल्या डॉक्टरांशी संपर्क साधावा.

प्र. ५

## ताप आणि खोकल्याने आजारी असलेल्या माझ्या मुलाची काळजी कशी घेऊ?

मुलांमध्ये ताप आणि खोकला एकत्रित लक्षणे असली तरी कोणते लक्षण मुलाला त्रास देत आहे त्यानुसार त्यावरचे उपाय स्वतंत्र आहेत.

**तापासाठी...**

जर तुमचे मुल ताप असताना सुद्धा खातपित असेल, खेळत असेल तर काहीही करण्याची गरज नाही. लक्षात ठेवा ताप तुमच्या मुलाला संसर्गाशी लढण्याची मदत करतो.

**काय करावे ?**

**जर तुमचे मुल आजारी असेल तर तुम्ही हे करु शकता.**

- त्याला किंवा तिला आराम करायला लावा.
- त्यांना भरपूर पातळ पदार्थ-पाणी, दूध, फळांचा रस इत्यादी प्यायला द्या.
- गरजेनुसार पचण्यास हलके व पौष्टिक जेवण द्या.
- त्याच्या खोलीचे तापमान आरोग्यदायक आणि स्थिर असल्याची खात्री करा. खूप गरम किंवा थंड नाही याची खात्री करा.
- त्याचा चेहरा, हात, मान पाण्यात कापड भिजवून पुसून घ्या.
- मुलाला हलके सुती कपडे घाला.
- बिछाना स्वच्छ ठेवा आणि कपडे नियमित बदला.
- रात्री झोपेतसुद्धा मुलाची तपासणी करा. जर त्याच्यात सुधारणा होत नसेल किंवा तुम्हाला काळजी वाटत असेल तर त्यांना डॉक्टरांकडे घेऊन जा.

**हे करु नका....**

- ताप असताना शरीर थंड होण्यासाठी तुमच्या मुलाला थंडी वाजेल अशा कोणत्याही पद्धतीचा वापर करु नका.
- गरम पाण्याच्या बाटल्या किंवा इलेक्ट्रिक ब्लँकेट वापरु नका

**औषधे...**

- तुमचे मुल आनंदी असल्यास तापावर औषधाने उपचार करण्याची गरज नाही.
- जर तुमचे मुल आजारी दिसत असेल आणि खेळत नसेल तर तुम्ही पॅरासिटामॉल देऊ शकता.
- ताप पुन्हा येत असल्यास पॅरासिटॅमॉल सुमारे ६ तासानंतर पुन्हा देऊ शकता. आपण बाटलीवरील डोस, सूचनांचे पालन केले पाहिजे. शिफारिस केलेल्या डोसपेक्षा जास्त डोस देणे धोकादायक ठरु शकते. पॅरासिटामॉल या औषधाने ताप कमी होईलच असे नाही. मुलास बरे वाटावे एवढाच त्याचा उपयोग असतो.

**खोकल्यासाठी ...**

- साधारणपणे तुम्ही घरी सौम्य खोकला दूर करु शकता. सहसा खोकला काही दिवसांपासून ते काही आठवड्यामध्ये निघून जातो.
- मुलांमध्ये सौम्य खोकला आणि तापासाठी घरगुती काळजी कशी घ्यावी

१. घरात धुम्रपान टाळा ज्यामुळे खोकला वाढतो. २. कोमट पाणी पिण्यास द्या.

३. सर्दीने नाक चोंदले असेल तर सलाईन ड्रॉप्स नाकात घाला. ४. छाती आणि पाठीवर वेपोरब लावले जाऊ शकते.

५. पेट्रोलअम जेलीमध्ये कापूर, मेंथोल आणि निलगिरी तेल घालून वापरु शकता.

६. पाण्याची वाफ खोकला कमी करण्यासाठी उपयुक्त ठरते. गरम पाण्यामुळे होणारे अपघात टाळण्यासाठी हा उपाय मात्र पालकांच्या देखरेखीखाली आणि अत्यंत काळजीपूर्वक करावा लागतो.

## प्र. ६

### माझ्या मुलाला वारंवार ताप आणि खोकला येत आहे. मी ते कसे रोखू? त्याची प्रतिकारशक्त वाढवण्यासाठी काय करु?

खोकला किंवा ताप ही लक्षणे रोगप्रतिकारशक्ती कमी झाल्यामुळे होत नाहीत. प्रतिकारशक्ती हा शब्द आजकाल खूप वेळा वापरला जातो. बहुतेकदा डॉक्टरांपेक्षा पालकांकडून चुकीचा अर्थ लावला जातो. वेगवेगळ्या माध्यमातून मिळवलेली अपूर्ण माहिती आणि मिळवलेले अर्धवट ज्ञान यामुळे गैरसमज पसरतात. रोगप्रतिकारशक्ती ही प्रत्येक निरोगी व्यक्तीचा अविभाज्य घटक आहे. जन्मत: ती अपरिपक्व असते आणि जसजसे आपण मोठे होतो तशी रोगप्रतिकारशक्ती परिपक्व होते. बालपणातील विविध संसर्ग आणि नैसर्गिक अनुभवांच्या संपर्कात आल्यावर प्रतिकारशक्ती परिपक्व होते. परिपक्व प्रतिकारशक्ती असलेल्या लहान बाळाला वारंवार विषाणू व जीवाणूंचा संसर्ग होण्याची शक्यता असते. जसजसा त्याला नैसर्गिक संक्रमणांचा अनुभव येतो तसतसे त्याचे शरीर त्यांना ओळखण्यास आणि पुढील आयुष्यासाठी सक्षम करण्यास शिकते. प्रत्येक मुलाला आयुष्याच्या पहिल्या वर्षी सरासरी १० ते १२ संसर्ग होतात आणि दुसऱ्या वर्षी सुमारे ६ ते ८ वेळा संक्रमण होऊ शकते. हे आवश्यक आहे, यामुळे ती नंतरच्या आयुष्यात कमी वेळा आजारी पडतात असे आपण म्हणू शकतो.

**नैसर्गिकरित्या रोगप्रतिकारशक्ती वाढवणारे आणि वारंवार खोकला-ताप टाळणारे घटक**

- सर्व उपलब्ध लसी देणे.
- बाळाला पहिले ६ महिने केवळ स्तनपान देणे, नंतर २ वर्षापर्यंत पूरक आहाराबरोबर स्तनपान चालू ठेवणे.
- जीवनसत्वे-खनिजद्रव्य-प्रथिनयुक्त संतुलित आहार.
- आयुष्याच्या पहिल्या वर्षासाठी ड जीवनसत्व देणे आवश्यक
- बालपणात लोहक्षार देणे आवश्यक.
- धूर आणि धुळीचा संपर्क टाळणे.
- स्वच्छतेच्या आरोग्यदायी सवयी रोज आंघोळ, दातांची काळजी, जेवणापूर्वी हात धुणे आणि स्वच्छतेविषयी जागरुकता. मुलांनी ती काटेकारपणे पाळली पाहिजे हे पालकांनी पाहावे.

सर्दी, खोकला रोखण्यासाठी रोगप्रतिकारशक्ती वाढवणारे कोणतेही विशिष्ट औषध नाही.

## प्र. ७

### माझ्या मुलाची रक्त तपासणी करणे किंवा छातीचा एक्स-रे काढणे आवश्यक आहे का?

रक्त तपासणी करण्याचा किंवा छातीचा एक्स-रे काढण्याचा निर्णय लक्षणांची माहिती घेतल्यानंतर व योग्यरित्या तपासल्यानंतर डॉक्टर घेतात. बहुतेक वेळा अशा तपासण्याची आवश्यकता नसते.

**डॉक्टर कधी तपासणी करतात :-**

१. लक्षणे दीर्घकाळ राहिली तर
२. लक्षणे कमी होत नसतीलतर किंवा रुग्ण अपेक्षेप्रमाणे प्रतिसाद देत नसेल तर
३. तुमचे मुल पहिल्याच भेटीत जास्त आजारी आहे किंवा उपचार करुन सुद्धा आजार वाढल्यास.
४. रोगाचे निदान करण्यासाठी किंवा निदान निश्चित करण्यासाठी किंवा मुल प्रतिसाद कसो देत आहे हे पाहण्यसाठी या सगळ्या तपासण्यांची गरज लागू शकते.

## प्र. ८

### आपण मुलाला प्रतिजैविके (अँटीबायोटिक) देऊ या का? गेल्यावेळी त्यामुळे पटकन गुण आला होता.

बहुतेक वेळा खोकल्याबरोबर ताप हे विषाणू संसर्गाचे लक्षण असू शकते. जीवाणूमुळे होणाऱ्या संक्रमणाची शक्यता १०% पेक्षा कमी असते. प्रतिजैविक-औषधे ही जीवाणूंमुळे होणाऱ्या संसर्गावर प्रभावी असतात आणि विषाणू संसर्गाविरुद्ध त्यांची भूमिका नसते. जीवाणू संसर्गाचे निदान करण्यासाठी मुलाची योग्य तपासणी करणे आवश्यक असते आणि तपासणी शिवाय प्रतिजैविक-औषधे दिली जाऊ शकत नाहीत. सर्व औषधांचे आणि विशेषत: प्रतिजैविकांचे अनेक दुष्परिणाम असतात. अयोग्यरित्या, अयोग्य कालावधीसाठी, अयोग्य डोसमध्ये मोठ्या प्रमाणात प्रतिजैविकांचा सर्रासपणे वापर केल्यामुळे प्रतिजैविकांचा प्रतिकार (antibiotic resistance) वाढला आहे. एक जबाबदार नागरिक या नात्याने प्रतिजैविकांच्या प्रतिशक्तीचा प्रसार टाळण्यासाठी आपण प्रतिजैविकांचा अयोग्य उपयोग टाळला पाहिजे.

## प्र. ९

## माझ्या मुलासाठी औषधांच्या दुकानात मिळणारी खोकल्याची औषधे किंवा खोकला आणि ताप यावरील एकत्रित औषध वापरु शकतो का? लहान मुलांना, मोठ्या माणसांच्या औषधाचा अर्धा डोस देऊ शकतो का?

- केमिस्टच्या दुकानातून मुलांच्या आजारांसाठी डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय औषधे घेतल्यास दुष्परिणाम व्हायची शक्यता खूप जास्त असते. ही औषधे साध्या सौम्य आजारांसाठी मोठ्या माणसांनी घेतली तर चालू शकतात.
- सर्दी खोकल्यांसाठी केलेली औषधे अनेक घटकांच्या मिश्रणाने बनवली जातात. ही मिश्रणे संयुक्तिक किंवा असयुक्तिक असतात. योग्य वैद्यकीय सल्ल्याशिवाय घरी वापरु नका.
- बहुतेक औषधे प्रौढांच्या वापरासाठी असतात. लहान मुलांचे वय आणि वजन यानुसार त्यांना डोस दिले जातात. चुकीचे औषध आणि चुकीचे डोस यांचा लहान मुलांना धोका जास्त असू शकतो, आणि त्याचे गंभीर परिणाम होऊ शकतात. म्हणून मोठ्यांची औषधे मुलांना वापरु नका.

## प्र. १०

## माझ्या ३ महिन्यांच्या बाळाला ताप आणि खोकळा आहे. हा माझ्या ५ वर्षाच्या मुलाला आलेल्या ताप आणि खोकल्या सारखाच आजार आहे का?

सर्वसाधारणपणे कोणत्याही आजाराच्या दृष्टीने बाळ जेवढे लहान तेवढे आजाराचे स्वरुप गंभीर. खोकला आणि ताप असलेल्या ५ वर्षाच्या मुलाच्या बाबतीत जर ताप असताना बाळ व्यवस्थित खेळत असेल, त्याच्या श्वसनाची गती योग्य असेल आणि अन्न-पाणी व्यवस्थित प्रमाणात घेत असेल, शिवाय लघवी योग्य प्रमाणात करत असेल तर काहीही काळजी करण्याची गरज नाही. या बाळाच्या बाबतीत तुम्ही डॉक्टरांचा सल्ला दूरध्वनीवरुन घेऊ शकता.

३ महिन्यांचे बाळ हे लहान असल्यामुळे त्याची रोग प्रतिकारशक्ती कमी असते. त्याचे बारकाईने निरीक्षण करण्यास अडचणी येतात आणि त्याची प्रकृती पटकन बिघडण्याची शक्यता असल्यामुळे अशा बाळांबाबत ताबडतोब डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक आहे. या बाळाला निरीक्षणासाठी दवाखान्यात ठेवण्याची गरज भासू शकते. अशा प्रकारे तीन महिन्यांच्या बाळाचा खोकला आणि ताप जर जास्त असेल तर डॉक्टरांच्या सल्ल्यानुसारच उपचार करणे आवश्यक ठरते.